**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २६७** **दिनांक :- २५/०९/२०२१**

**वर्सोवा नाका येथे अवजड वाहनांना करण्यात आलेली प्रवेशबंदी पुढे ढकल्यात आलेली आहे.**

मिरा-भाईंदर शहरातील वर्सोवा नाका येथे जुन्या खाडी पूलाच्या दुरुस्तीचे काम करण्यासाठी सदर पुलावरुन अवजड वाहनांची वाहतूक बंद ठेवावी लागणार असल्याचे व पुलाच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने पुलाचे दुरुस्तीचे काम तातडीने करणे गरजेचे असल्याबाबत आय.आर.बी. सुरत, दहीसर यांनी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयास पत्राद्वारे कळविले होते. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे वतीने दिनांक २१/०९/२०२१ रोजी अधिसुचना जारी करण्यात येवून सदर पुलावरुन दिनांक २६/०९/२०२१ ते दि. २८/०९/२०२१ या ३ दिवसांच्या कालावधीमध्ये ठाणे व मुंबईकडून पालघर-गुजरात बाजूकडे जाण्या-या अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली होती.

मात्र ठाणे शहरातील रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे झाल्याने व वाहतूक कोंडी होत असल्याने सदर पुलाच्या दुरुस्तीचे काम संबंधीत विभागाकडून पुढे ढकलण्यात यावे याबाबत ठाणे शहर वाहतूक विभागाकडून कळविण्यात आल्याने सदर बाब विचारात घेवून आय.आर.बी. सुरत यांनी वर्सोवा पुलाच्या दुरुस्तीचे काम वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ८-१० दिवस पुढे ढकलण्यात येत असलेबाबत कळविले आहे. त्यामुळे दिनांक २६/०९/२०२१ ते दि. २८/०९/२०२१ या ३ दिवसांच्या कालावधीकरिता वर्सोवा पुलावरुन अवजड वाहनांना बंद करण्यात आलेली वाहतूक बंदी दिनांक २५/०९/२०२१ च्या अधिसुचनेद्वारे उठविण्यात आलेली असून सदरील कालावधीमध्ये वर्सोवा पुलावरुन अवजड वाहनांना नियमीत वाहतूक करता येणार आहे.

----ooo----